## स्वप्नवेडी !

मी कोण?
एक वेडी -
आसुसलेली...
प्रेमासाठी !
आभाळाच्या अंतापर्यंत,
सागराच्या खोलीएवढे,
फुलपाखरी उत्साहाने,
भरभरून वाहणारे - प्रेम !
पहाटेच्या पानावर,
पडलेल्या दवासारखे,
नाजूक-हळवे, प्रेम !
जीवनभर इंद्रधनुषी,
रंगात रंगविणारे,
सप्तपदीच्या सात सुरांत
तन-मन गुंतविणारे -
स्वरमयी - प्रेम !
डोळेभरल्या आसवाला,
पापणीवरंच थांबविणारे,
ओघळलेच कधी तर -
ओठांनी टिपणारे - प्रेम !
आयुष्याच्या संध्याकाळी,
विश्वासाचा आधार देणारे,
अनंतात विलीन होताना-
अंतरंगाची एकरूपता साधणारे - प्रेम !
खरंच,
मी कोण?
एक वेडी,
व्यवहारी जगात-
प्रेम शोधणारी..

खरंच !!!!

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**